मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच ‘वाहनमुक्त दिवस’

## रस्ते पादचाऱ्यांसाठी मोकळे : झुंबा, लाइव्ह म्युझिक, महिला स्पर्धा, खाद्य स्टॉल्ससह अनोखा उत्सव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पहिल्यांदाच “वाहनमुक्त दिवसाचे आयोजन करत आहे. येत्या शनिवार व रविवार दि. ८ व ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा उपक्रम पिंपरी मार्केट परिसरात, साई चौक ते महर्षी वाल्मिकी चौक दरम्यान राबवला जाणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे २३.२१ लाख वाहने असून, २५ लाख लोकसंख्या आहे. वाढत्या वाहनसंख्येमुळे, चालणे, सायकल चालवणे आणि सार्वजनिक वाहतूक यासारख्या पर्यायी आणि शाश्वत वाहतुकीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यामुळे वाहनमुक्त दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

पिंपरी मार्केट हा परिसर शहरातील सर्वात वर्दळीच्या भागांपैकी एक आहे. येथे अंदाजे ताशी ८,००० नागरिक ये-जा करतात. केवळ वाहनेच नव्हे, तर मोठ्या प्रमाणावर पादचारीही येथे येत असतात. या वाहनमुक्त दिवसाचा मुख्य उद्देश नागरिकांना मोकळ्या




रस्त्यांचा आनंद घेण्यास संधी देणे आहे, जिथे ते चालू शकतील, धावू शकतील आणि बाजार परिसराचा आनंद घेऊ शकतील.

याशिवाय, सावता माळी नगर (सर्वात जवळील प्रदूषण निरीक्षण केंद्र) येथे २०२४ मधील PM 2.5 प्रदूषण पातळी ४५.९ $\mu G/M^3$ इतकी नोंदवली गेली. त्यामुळे हा भाग शहरातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित परिसर आहे. “वाहनमुक्त दिवस” हा लोकांना प्राधान्य देऊन आपण सुरक्षित, निरोगी आणि अधिक रहिवासीस्नेही पिंपरी-चिंचवडकडे वाटचाल करू शकतो याचा अनुभव देणारा आहे.

कार्यक्रमाच्या दिवशी, सकाळी ९ वाजल्यापासून महर्षी वाल्मिकी चौक ते शगुन चौक आणि शगुन चौक ते साई चौक यादरम्यानची वाहने बंद केली जातील. शगुन चौकाचा महत्त्वाचा जंक्शन वाहतुकीसाठी अंशतः खुला असेल, या ठिकाणी उड्डाणपुलावरून येणाऱ्या सर्व वाहनांना फक्त उजवीकडे वळण्याची परवानगी असेल. पर्यटकांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. पीएमपीएमएल आणि मेट्रो शटल सेवा देखील प्रदान केल्या जातील. कार्यक्रमस्थळी पोहोचण्यासाठी सर्वात जवळचे मेट्रो स्टेशन पीसीएमसी भवन मेट्रो स्टेशन आहे. बस वापरणारे लोक लाल मंदिर, पीसीएमसी भाजीपाला बाजार, भाट नगर बस स्टॉपवर उतरू शकतात. या दिवशी बाजारातील दुकाने सुरू राहतील, तसेच माल वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था केली आहे. अतिरिक्त मोबाइल शौचालये, बसण्याची सोय आणि पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. आपत्कालीन सेवांसाठी वाहतूक खुली राहील.

### कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण

» यादिवशी नागरिकांसाठी सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये झुंबा, लाईव्ह म्युझिक, महिलांसाठी खेळ, तसेच विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्स आकर्षणाचा भाग असतील. पादचाऱ्यांसाठी विशेषतः अनुकूल बाजार परिसर तयार करण्यात येईल, जिथे ते मोकळ्या जागांचा आनंद घेऊ शकतील, आरामदायी बसण्यासाठी सोय असेल, तसेच वाहतूक तसेच रस्ता सुरक्षा अशा विषयावर माहितीपट दाखवण्यात येतील.

“ सदर उपक्रम स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून ठरवण्यात आला आहे. बाजार संघटनांसोबत झालेल्या चर्चांनंतर, व्यापाऱ्यांनी दोन दिवसांचा हा उपक्रम चाचणी म्हणून मान्य केला आहे. त्यामुळे शहरातील नागरिक या परिवर्तनाचा अनुभव घेऊन वाहनमुक्त दिवसाच्या संकल्पनेला पाठिंबा देतील ही आशा आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# पिंपरी-चिंचवडसाठी मुळशी धरणातील पाणी आरक्षणाची मागणी

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना आमदार महेश लांडगे यांचे निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढती लोकसंख्या आणि भविष्यकाळात पाण्याची मागणी लक्षात घेता पिंपरी-चिंचवड शहरासाठी मुळशी धरणातून पाणी आरक्षणाला मंजुरी देण्याबाबत महायुती सरकारने सकारात्मक विचार करावा, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची आमदार लांडगे यांनी मुंबईत भेट घेतली. यावेळी पिंपरी-चिंचवडचा पाणी पुरवठा आणि नवीन जलस्त्रोत निर्मिती याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे 30 लाखांच्या घरात आहे. शहरातील वाढते नागरीकरण आणि पाण्याची मागणी याचा विचार करता भविष्यात पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर



होणार आहे. त्यामुळे अतिरिक्त जलस्त्रोत निर्माण करण्याची नितांत आवश्यकता असून, मुळशी धरणातून पिंपरी-चिंचवडसाठी पाणी आरक्षीत करावे, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने राज्य शासनाला पाठवला आहे.

दरम्यान, पुण्यात कालवा समितीची बैठक झाली. या बैठकीमध्ये उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्याकडे स्थानिक आमदारांनी पुण्यासाठी मुळशी धरणातून पाणी आरक्षणाबाबत मागणी केली आहे. त्यासंदर्भात कालवा समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. त्याला अनुसरून, पिंपरी-चिंचवडसाठीसुद्धा मुळशी धरणातून पाणी आरक्षीत व्हावे, याबाबत सकारात्मक विचार करावा, अशी विनंती आमदार लांडगे यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला सध्या पवना धरण आणि आंद्रा, भामा- आसखेड धरणातून पाणी पुरवठा सुरू आहे. मात्र, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प अद्याप सुरू नाही. तसेच, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाचा दुसरा टप्पा अद्याप कार्यान्वयीत झालेला नाही. सबब, शहरातील पाण्याची मागणी आणि पुरवठा याचे प्रमाण व्यस्त असून, सोसायटीधारकांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. परिणामी, पाणी पुरवठा आणि टंचाई ही समस्या संवेदनशील बनली आहे.

# महापालिकेचा 12 हजार 618 कोटींचा अर्थसंकल्प सादर

## 15 दिवसांत सर्व वाहने हटवली जाणार : वाहतूक विभाग आणि महापालिकेकडून संयुक्त कारवाई



**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरावर कोणतीही कर वाढ न करणारे पुणे महापालिकेचे २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १२ हजार ६१८ कोटींचा अर्थसंकल्प महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्थायी समितीला सादर केला. यामध्ये स्वछता, आरोग्य आणि पायाभुत सुविधावर भर देण्यात आला आहे.

पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., अप्पर आयुक्त महेश पाटील, वित्त व लेखाधिकारी उल्का कळसकर, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, नगरसचिव योगिता भोसले आदी उपस्थित होते. पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावासाठी तब्बल ६२३ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे समाविष्ट गावामध्ये पायाभुत सविधा निर्माण होणार आहे.

पुणे महापालिकेनं समान पाणीपुरवठ्याची योजना राबवली आहे. त्याचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे त्यामुळे आगामी वर्षात पुणेकरांना पाण्याचं बील मीटर प्रमाणे द्यावे लागणार आहे पुराचा फटका बसलेल्या सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी मधील घरांचे पुनर्वसन महापालिका करणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे. नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी आता उपायुक्त स्तरावर समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमध्ये नागरिकांचे विविध प्रश्न, समस्या यांचे निराकरण केले जाणार आहे.

### पुणेकरांना आता विजेप्रमाणे पाण्याचे बिल

पुणेकरांना आगामी वर्षात मीटर प्रमाणे पाणी वापराचे बील द्यावे लागणार आहे. महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितले की, महापालिकेने समान पाणी पुरवठ्याची योजना राबवली असून ती पूर्णत्वास आली आहे. त्यामुळे आगामी वर्षात पुणेकरांना पाण्याचे बील मीटरप्रमाणे भरावे लागणार आहे. याशिवाय सिंहगड रस्त्यावरील एकता नगरीमधील काही घरांना पुराचा फटका बसला होता. महापालिकेकडून या घरांचे पुनर्वसन केले जाणार आहे. यासाठी देखील अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे.

### महापालिकेला मिळणार इतका महसूल

- स्थानिक संस्था करातुन 545 कोटी रुपये
- जीएसटी मधुन 2 हजार 701 कोटी रुपये
- मिळकत करातुन 2 हजार 847 कोटी रुपये
- बांधकाम विकास शुल्कातुन 2 हजार 899 कोटी रुपये
- पाणीपट्टी मधुन 618 कोटी रुपये
- शासकीय अनुदान 1 हजार 633 कोटी रुपये
- कर्ज रोखे 300 कोटी रुपये
- इतर 975 कोटी रुपये जमा होणार आहेत

### अर्थसंकल्पात या विकास कामांसाठी तरतुदी

- इमारतींच्या बांधकामासाठी 490 कोटी रुपयांची तरतूद
- रस्त्यांसाठी 1 हजार 126 कोटी रुपयांची तरतूद
- नदी सुधारणा योजनेसाठी 396 कोटी रुपयांची तरतूद
- आरोग्यासाठी 569 कोटी रुपयांची तरतूद
- पाणीपुरवठ्यासाठी 1 हजार 665 कोटींची तरतूद
- घनकचरा व्यवस्थापनासाठी 142 कोटींची तरतूद
- मनपात समाविष्ट 34 गावांसाठी 623 कोटी रुपयांची तरतूद

# माण-हिंजवडी मेट्रोची लवकरच ट्रायल रन

## चेन्नईतून पुण्यात मेट्रोचे कोच दाखल : कोचची तपासणी सुरू, ट्रायल रन घेण्यात येणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रगतीपथावर असून, या मार्गावरून धावणाऱ्या मेट्रोचे कोच श्रीसिटी चेन्नई येथून नुकतेच दाखल झाले आहेत. या मार्गाच्या पहिला टप्प्यातील आठ किलोमीटरदरम्यान कोचची ट्रायल रन घेण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्षात ऑक्टोबर 2025 पर्यंत मेट्रो सुरू होईल, असे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर हा मेट्रो प्रकल्प पीएमआरडीएकडे आहे. पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्वावर प्रकल्पाचे काम सुरू आहे. प्रकल्पाच्या कामातील दिरंगाईमुळे मपीएमआरडीएफने ठेकेदाराला दंडात्मक कारवाईचा इशारा देत काम पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली. त्यानंतर जुलैपासून काम वेगाने सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, यापूर्वी वेगवेगळ्या कारणांनी या प्रकल्पाचा वेग कमी होता. त्यानंतर संबंधित मेट्रो उभारणाऱ्या कंपनीला नोटीस दिल्यानंतर कामाची गती वाढली.

हिंजवडी (माण, मेगापोलिस) ते शिवाजीनगर हा पुणे आणि पिंपरी-चिंचवड या शहरांना जोडणारा मेट्रो प्रकल्पातील तिसरा मेट्रो मार्ग आहे. हा संपूर्ण मार्ग उन्नत असून, पुणे-बंगळुरू महामार्ग आणि मुळा नदीवरून जात आहे. प्रामुख्याने बाणेर, सकाळनगर आणि सिव्हिल कोर्ट स्थानकांची कामे शिल्लक आहेत. यांसह विविध ठिकाणी जिने आणि अकरा स्थानकांचे महत्त्वाचे काम बाकी आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर मेट्रोची मट्रायल रनफ घेण्यात येणार आहे.

आतापर्यंत पीएमआरडीएच्या मेट्रो प्रकल्पात गेल्या वर्षी एक तर गेल्या आठवड्यात एक अशा दोन ट्रेन अर्थात दोन संच दाखल झाले आहेत. मेट्रोचा तिसरा आणि चौथा संचदेखील मार्चअखेर उपलब्ध होणार असल्याचे पीएमआरडीए प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मेट्रोच्या एका संचामध्ये तीन कोच आहेत.

> नव्याने दाखल झालेल्या मेट्रो संचाची तपासणी सुरू आहे . डेपोमध्ये एक किलोमीटरचा मार्ग तयार केला आहे. त्यावरती त्याची तांत्रिक तपासणी पूर्ण केली जाते. त्यानंतर सीएमआरएस (कमिश्नर ऑफ मेट्रो रेल्वे सेफ्टी) यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. पुढील पाच ते सहा महिन्यांमध्ये प्रत्यक्षामध्ये मेट्रो मार्गावर त्याची तपासणी केली जाईल.
>
> **- रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए**

# ठेकेदार काळ्या यादीत; भ्रष्ट अभियंते मात्र मोकाट

## निकृष्ट दर्जाचे रस्ता आणि देखभाल दुरुस्ती काम प्रकरणामधील अनेक दोषी अभियंते सेवानिवृत्त तर काहींना पदोन्नती

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या स्थापत्य विभागातील अधिकारी, राजकारणी आणि ठेकेदार मिळून निकृष्ट व दर्जाहीन कामे करुन पालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारत आहेत. पालिकेच्या स्थापत्य विषयक कामात ४० ते ४५ टक्के पेक्षा कमी दराने ठेकेदारांनी निविदा भरुन निकृष्ट केली. या कामांच्या माध्यमातून लाखो रुपयाची बिले लाटली आहेत. या प्रकरणातील अकरा ठेकेदारांवर आयुक्तांनी काळ्या यादीमध्ये टाकत ब्लॅक कारवाई केली आहे. त्याबरोबरच कामांच्या दुप्पट रक्कमे वसूली करण्याचे आदेश दिले. मात्र, या कामावर देखरेख करणारे १७ कनिष्ठ अभियंते, उपअभियंते, कार्यकारी अभियंते यांच्यावर कारवाई न करता त्यांना मात्र मोकाट सोडले आहे.



दरम्यान, भ्रष्ट अभियंत्यांवर कारवाईची फाईल आयुक्तांकडे पाच महिने झाले धूळखात पडली आहे. यातील काही अभियंते सेवानिवृत्त झाले असून काहींना पदोन्नती देण्यात आली आहे. पालिकेच्या स्थापत्य विभागातील रस्ते दुरूस्ती, पेव्हींग ब्लॉक, मातीचे जॉगिंग ट्रॅक यासारखी कामे घेताना ११ ठेकेदारांनी १४ विकास कामात तब्बल ४० ते ४५ टक्के कमी दराने निविदा भरल्या होत्या.

एवढ्या कमी दरात काम घेतल्यानंतर त्याचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहिली का? याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना खातरजमा करायची होती. त्यानूसार आयुक्त सिंह यांनी ११ ठेकेदाराच्या १४ कामाचा दर्जा अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ( सीओईपी) यांच्याकडून तपासण्याचे आदेश महापालिका दक्षता व नियंत्रण विभागाला सप्टेंबर २०२२ मध्ये दिले होते.या कामाची निविदा प्रक्रिया स्थापत्य विभागाने २०१९-२० मध्ये राबविली होती. त्यानुसार सीओईपीच्या प्रतिनिधींनी २७ जून २०२३ ते १२ जुलै २०२३ या कालावधीत प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी केली.

दक्षता व नियंत्रण विभागाने पुण्यातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सीओईपी) कडून कामांची गुणवत्ता व दर्जाची तपासणी करण्यात आली. सीओईपीने केलेल्या तपासणीत पेंव्हीग ब्लॉकच्या कामात ब्लॉक खचलेले, ज्याठिकाणी दुरूस्ती आवश्यक अशा ठिकाणी दुरूस्तीच केली नाही, महापालिका मानांकनानुसार काम झालेले नाही, रस्ते दुरूस्ती केल्यानंतर त्वरित खड्डे पडणे, रस्त्यावरील कॉक्रींट थराची जाडी कमी असणे, जॉगिंग ट्रॅकवर कमी माती टाकणे, निविदेनुसार काम न करणे अशा शेकडो त्रूटी समोर आल्या आहेत. त्याचा अहवाल १९ ऑक्टोबर २०२३ मध्ये पालिकेच्या दक्षता व गुणनियंत्रण कक्षाकडे सादर केला.

या कामाशी संबंधीत ठेकेदारांना नोटीस बजावून शहर अभियंता मकरंद निकम यांनी ११ ठेकेदारांना एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेतला. तसेच ठेकेदारांकडून निकृष्ट केलेल्या कामाचा निविदा रक्कमेच्या दुप्पट खर्च वसूल करण्यात आला. दरम्यान, दोषी आढळलेल्या संबंधित १७ कनिष्ठ अभियंत्यांवर गेल्या पाच महिन्यापासून अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. या प्रकरणातील काही अभियंते सेवानिवृत्त झाले असून, काहींना पदोन्नती देण्यात आली आहे.

### अभियंत्यांना नोटीस, कारवाई शून्य

» कामाबाबत अनास्था आणि कर्तव्याप्रति निष्काळजीपणा तसेच प्रशासकीय कामकाजातील हलगर्जीपणा आणि कर्तव्यातील उदासीनता दिसून येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत त्यांना सर्वांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर शहर अभियंता मकरंद निकम यांनी त्यांच्यावर कारवाईची शिफारस आयुक्त सिंह यांच्याकडे पाच महिन्यापूर्वी केली आहे. पण, सदरची फाईल धूळखात पडली आहे.

> दुय्यम दर्जाचे रस्ते दुरुस्ती व इतर कामांच्या प्रकरणातील महापालिकेच्या दोषी कनिष्ठ अभियंत्यांवर कारवाईबाबतचा अहवाल आयुक्तांसमोर गेल्या महिन्यात सादर केला आहे. त्या संदर्भात योग्य तो निर्णय ते घेतील.
>
> - मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका.

# उपचारासाठी रुग्णांना करावी लागणार आणखी प्रतिक्षा

## चिंचवडगाव येथील तालेरा मल्टिस्पेशालिटी रुग्णालयात 50 बेडचा बाह्यरुग्ण विभाग सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवडगाव येथील तालेरा रुग्णालयाच्या नव्या इमारतीमध्ये सध्या बाह्यरुग्ण विभाग सुरू आहे. या इमारतीत सुरुवातीला आंतररुग्ण विभागासाठी ५० खाटांची सोय केली आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने अन्य विभाग सुरू केले जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांना उपचारासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.



तालेरा रुग्णालयाच्या नव्या इमारतीचे नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. २५० खाटांचे हे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय बांधले आहे. तालेरा रुग्णालयाची नवीन इमारत पाच मजली आहे. पहिल्या मजल्यावर बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे. येथे रक्त तपासणीसाठी नमुने घेतले जात आहेत. क्ष-किरण आणि सोनोग्राफीची सुविधा जुन्या इमारतीत उपलब्ध आहे.

या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयात अडीचशे खाटा असून सर्व सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. इतर विभागांमध्ये अद्याप यंत्रसामग्री नाही. त्यामुळे हे विभाग सुरू व्हायचे आहे. त्यामुळे २५० खाटांचे हे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय पूर्ण क्षमतेने कधी सुरु होणार? असा सवाल शहरातील नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

> तालेरात सध्या बाह्यरुग्ण विभाग सुरू केला आहे. येथे प्रथम ५० खाटांचा आंतररुग्ण विभाग सुरू केला आहे. २५० खाटांचे हे मल्टिस्पेशालिटी असे रुग्णालय बांधले आहे. पुढील विभागातील यंत्र-सामुग्री आणल्यानंतर लवकरच सुरु होतील.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, वैद्यकीय अधिकारी, महापालिका.

# विद्यार्थिनींच्या पीएमपीला आता महिला सुरक्षारक्षक

## स्वारगेट एसटी बसस्थानकात तरुणीवरील अत्याचाराच्या घटनेनंतर महापालिका प्रशासनाचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वारगेट एसटी बसस्थानकात तरुणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर मोठी खळबळ उडाली. या प्रकरणामुळे मुलींच्या आणि महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने शाळांमधील विद्यार्थिनींची ने-आण करणाऱ्या पीएमपीच्या बसमध्ये आता महिला सुरक्षारक्षक नेमण्याचा निर्णय घेतला आहे.



पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी पीएमपीएमएलची बससेवा आहे. या बससेवेतून विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवासाची सेवा दिली जाते. या सेवेदरम्यान विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव महिला सुरक्षारक्षक नेमण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यासाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात तरतूद केली जाणार आहे.

तीन दिवसांपूर्वी स्वारगेट एसटी स्थानकातील बसमध्ये तरुणीवर झालेल्या अत्याचाराची घटना घडल्याने राजकीय वातावरण तापले आहे. पुणे शहर सुरक्षित शहर म्हणून ओळखले जाते. परंतु याच शहरात आता गुन्हेगारीचे प्रमाण वाढू लागले आहेत. यात महिलांवर अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यातच स्वारगेट एसटी बसस्थानकावर प्रवाशांची मोठी वर्दळ असलेल्या ठिकाणी हा प्रकार घडल्याने संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले आहेत. या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यात लक्ष घातले आहे.

पुणे महापालिकेच्या शाळेत बसने येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी महापालिकेकडून सुरक्षारक्षक दिले जाणार आहेत. याची अंमलबजावणी पुढील काही दिवसांमध्ये केली जाणार आहे. या निर्णयानुसार प्रत्येक विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसमध्ये महिला सुरक्षा रक्षक असणार आहेत.

शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या स्कूल बस, तसेच स्कूल व्हॅनमध्ये महिला सहाय्यक असतात, मात्र महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींची ने-आण करणाऱ्या बसमध्ये महिला सुरक्षारक्षकांचा अभाव आहे. त्यामुळे महापालिकेने विद्यार्थिनींची वाहतूक सुरक्षितरित्या व्हावी, यासाठी पीएमपीएमएलच्या बसमध्ये महिला सुरक्षारक्षक नेमण्याच्या दृष्टीने पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे.

> महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींची ने-आण करण्याचे काम पीएमपीएमएलच्या सुमारे २०० ते ३०० बसच्या माध्यमातून केले जाते. महिला सुरक्षारक्षकांसाठी महापालिका प्रशासनाने शिक्षण विभागाबरोबर चर्चा केली आहे. त्यानुसार या सुरक्षारक्षकांची सेवा देण्यासाठी आर्थिक तरतूद केली जाईल. त्यासाठी अंदाजपत्रकात याबाबत विचार केला जाणार आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा महापालिकेचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या पीएमपी बसमध्ये महिला सुरक्षारक्षक नेमल्या जाणार आहेत.
>
> **- पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

# रेल्वेच्या डब्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नवीन कोचिंग डेपो

## आळंदी येथील स्थानकावर हा डेपो उभारण्यात येणार : त्यासाठी सुमारे 90 कोटी रुपये खर्च

**पुणे | प्रतिनिधी**

मध्य रेल्वे पुणे विभागातील रेल्वेच्या डब्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नव्याने 'कोचिंग डेपो' सुरू करण्यात येणार आहे. आळंदी येथील स्थानकावर हा डेपो उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे ९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. विशेष म्हणजे 'वंदे भारत एक्स्प्रेस'च्या डब्यांची निर्मिती आणि दुरुस्ती या ठिकाणी होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.



पुणे रेल्वे स्थानकात जागेची कमतरता पडत असल्याने विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचे नियोजन करता यावे, म्हणून मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. त्यामुळे या ठिकाणी डब्यांच्या दुरुस्त देखभाल करणाऱ्या 'कोचिंग डेपो'चे नियोजन होऊ शकत नसल्याने आळंदीची निवड केली आहे. त्यानुसार आळंदी स्थानक परिसरातील १० एकर जागेवर हा डेपो निश्चित करण्यात आला असून, पुणे रेल्वे विभागाकडून रेल्वे बोर्डाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.

### दररोज तीनशेहून अधिक डब्यांची दुरुस्ती

सद्यस्थितीला पुणे स्थानकाजवळील घोरपडी कोचिंग मेंटेनन्स कॉम्प्लेक्स (जेसीएमसी) या ठिकाणी डब्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येते. दररोज ३०० पेक्षा अधिक डब्यांची दुरुस्ती केली जात आहे. या ठिकाणीही वंदे भारत एक्स्प्रेसच्या डब्यांची दुरुस्ती करण्यासाठी नव्याने डेपो तयार करण्यात येत आहे. रेल्वे डब्यांच्या दुरुस्तीची संख्या वाढल्याने याचा फायदा प्रवाशांना होणार आहे.

### स्वतंत्र लाइन सुरू करणार

» **आळंदी येथे साकारण्यात येणाऱ्या 'कोचिंग डेपो'साठी स्वतंत्र रेल्वे लाइन तयार करावी लागणार आहे. त्यासाठी ६०० मीटर लांबीच्या 'पीट लाइन' आणि दोन 'स्टेबलिंग लाइन'सुरू करण्यात येणार आहे. तसेच, एखादा डबा नादुरुस्त असला किंवा अचानक बिघाड झाला, तर त्याच्या दुरुस्तीसाठी 'सिक लाइन'ची व्यवस्था करण्यात येणार आहे.**

> पुणे रेल्वे स्थानकातील गाड्यांचे नियोजन सुरळीत करून प्रवाशांना डब्यांमध्ये देण्यात येणाऱ्या सुविधांचा सहज लाभ घेता यावा, म्हणून स्वतंत्र 'कोचिंग डेपो' सुरू करण्याबाबत नियोजन होते. त्यानुसार आळंदी येथील जागेबाबत रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे.
>
> **- हेमंतकुमार बेहरा, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे, पुणे विभाग.**